बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

### माहिती कक्ष, दि २२ जानेवारी २०२५

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २५/२०२५ भा.न्या.सहिता कलम ३०५(A),३३१(३),३३१(४) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १६/०१/२०२५ रोजी २१.०० वा ते दि. १७/०१/२०२५ रोजी सकाळी ०८.३० वा चे दरम्यान, मार्केट यार्ड सोलापूर येथील यश ट्रेडर्स नावाचे दुकान |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/०१/२०२५ रोजी १४.२२ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | यश गिरीधारी निरंकारी, वय- २४ वर्षे, रा. गुरुनानक नगर, ब्लॉक नं. ०७, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | २९,५००/- रु वेगवेगळया कंपनीची सिगारेट पाकीट व साहित्य |
| **हकिकत** | | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे दुकानाचे कुलुप तोडुन, शटर कशाचेतरी सहाय्याने उचकटुन दुकानात प्रवेश करुन दुकानातील वरील वर्णनाचे व किंमतीचे साहित्य फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरून नेला आहे म्हणून. तपास:- पोह- १३८१ गंगावणे- |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४०/२०२५ भा.न्या.सहिता कलम १२५(A),(B) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २०/०१/२०२५ रोजी २१.३० वा चे सुमारास, हिप्परगा गावातील गणपती मंदिराजवळील हायवे ब्रिजवर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/०१/२०२५ रोजी १६.५६ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | सोमशेखर लिंगप्पा अक्कलकोटे, वय- ३९ वर्षे, रा. घर नं. ६६७, उत्तर कसबा, बाळीवेस, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | एम एच १२ एल टी ४२५३ चा चालक |
| **हकिकत** | | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीच्या व्ही आर एल रोड लाईन कंपनीचे कंटेनर क्रं. के ए ६३ ६०३४ यावरील चालक मल्लिकार्जुन शंकऱ्याप्पा मंगलोर हा दिल्ली वरुन सोलापूर मार्गे दावनगिरी येथे जात असताना वरील ठिकाणी एक टाटा कंपनीचा मालट्रक क्रं. एम एच १२ एल टी ४२५३ चा चालक याने गाडी रस्त्याच्या मधोमध त्यास कोणत्याही प्रकारचे पार्कींग लाईट किंवा रिप्लेक्टर न लावता अपघात होवू नये याची कोणतीही खबरदारी न घेता बेजबाबदार पणे उभी केल्याने फिर्यादीच्या व्ही आर एल रोड लाईन कंपनीचे कंटेनर क्रं. के ए ६३ ६०३४ वरील चालकास सदरचा ट्रक दिसला नसल्याने त्यास मागुन धडक दिल्याने जखमी होवून बेशुध्द पडला आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १३२२ बिरकुटे- |